ZEAL INSTITUTES
www.zealeducation.com

ZEAL EDUCATION SOCIETY'S
ZEAL COLLEGE OF ENGINEERING AND RESEARCH
Sr.No - 39, Narhe Dhayari Road, Narhe, Pune - 411 041( MS) India.
020-6720 6000/106 principal.zcoer@zealeducation.com www.zcoer.in
AISHE Code : C-41988 | DTE Code : EN-6298 | SPPU Pun Code : PU/PN/NGG/285/2007
Accredited by NAAC with 'A' Grade

Ref. No.: ZCOER/AD/72

Date : 04/09/2021

# NOTICE - BRANCH CHANGE & COLLEGE CHANGE

**Reference: तंशिविकापु / विवि / पदवी / विनाअनुदानित संस्थाबदल २०२१ - २२ / ३८७८, दिनांक ०३/०९/२०२१**

**All the Second Year Engineering students for Academic Year 2021-22 are hereby informed that, those students who have interested to change of Branch should apply up to 18th September 2021 without fail as First Year Engineering Result is declared.**

Student should follow following process for submission of application.

1) **Students should collect application format (Annexure-A) from Student Section (Admin. Office)** or download application format (Annexure-A) attached with notice.
2) **Student should submit following documents for branch change**
   a) Original Application form (Annexure- A).
   b) Admission confirmation letter/CAP allotment letter (Xerox).
   c) First Year Engineering examination result (Xerox).
   d) If gap, affidavit with Rs. 100/- stamp paper (Original) / gap certificate issued by respective college Principal.

**Students should strictly submit their branch change application form along with above mentioned documents to college Admin Office- Student Section** or by email **amol.kate@zealeducation.com** on or before above mentioned date. After above mentioned date if any application recieved to college or incomplete applications will not be entertained.

Branch Change applications will be processed on merit basis & depending upon vacancy position of Second Year Engineering and as per guidelines given by Director of Technical Education (RO Office), Pune.

**Those students who want to apply for college change, they should visit to college Admin Office with required documents before 18.09.2021 or DSE Vacancy confirmation end date.**

**Late applications will not be accepted.**

**Course Choice code for Branch Change & College Change purpose.**

| Sr. No. | Choice Code | Course Name |
|---|---|---|
| 1 | 629819110 | Civil Engineering |
| 2 | 629821910 | Robotics and Automation |
| 3 | 629824510 | Computer Engineering |
| 4 | 629824520 | Computer Engineering |
| 5 | 629824610 | Information Technology |
| 6 | 629829310 | Electrical Engineering |
| 7 | 629837210 | Electronics and Telecommunication Engg |
| 8 | 629861210 | Mechanical Engineering |
| 9 | 629899510 | Artificial Intelligence and Data Science |

**Admission is under Supernumer quota student are not eligible for Branch Change (TFWS/EWS/J&K)**
**All HOD should Circulate the notice to students for necessary action.**
**For any queries contact – 020 67206158 / 8329337069 / 9850752614**

**Attachment with notice:**
1.) Application form (Annexure- A)
2.) Sampal copy of filled Application form (Annexure- A)
3) R.O. Pune, Circular.

ZES's Zeal College of Engineering & Research, PU/PN/Engg./285/2007, Narhe, Pune-41

Principal
ZES's Zeal College of Engineering & Research
Narhe, Pune - 411 041.

## ANNEXURE-A

## APPLICATION FOR CHANGE OF COURSE OR INSTITUTION AFTER I, II, OR III YEAR

1. Name of the Student (In Full) :________________________________

2. Application ID :________________________________

3. Academic year of Admission in the present Institute :________________________________

4. Whether Admission is under Supernumerary quota (Y/N):

5. Address for correspondence with :

Pin code & Telephone Nos. (if any)

6. Name of parent / present Institute with DTE code : DTE CODE:________________________

Name :________________________________

7. Course of Study Details : Year / Semester ______ Branch __________

Choice Code:________________________________

8. Details of the Result of last exam.

| Branch/Faculty | Year/ semester | Year of Passing | Summer / Winter | No of attempt | Percentage | University |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

9. Details of backlog subject (if any) :________________________________

10. Name and DTE code of aspiring institute where : DTE CODE________________________

Admission by transfer is sought Name ________________________________

11. Branch & Year /semester and university in which : Branch / Course________________________

Admission by transfer is sought Year /Semester________________________

Choice Code:________________________________

University:________________________________

12. Reasons for change of Institute / change of branch and :________________________________

University ________________________________

I the undersigned state that the information stated above is true to my knowledge and belief. I am fully aware that transfer / change of institute / branch is not a right and it is up to the authority to decide my case on the basis of merit.

**Date: / /2021** **Signature of Student**

**ANNEXURE-A**

Filled Sample form

## APPLICATION FOR CHANGE OF COURSE OR INSTITUTION AFTER I, II, OR III YEAR

1. Name of the Student (In Full) : Gaikwad Sachin Ramesh

2. Application ID : EN20101380

3. Academic year of Admission in the present Institute : 2020-21

4. Whether Admission is under Supernumerary quota (Y/N): No

5. Address for correspondence with : Mahalaxmi Residency sr.No.13 flat No.09 Near JSPM college, Narhe, pune 411041

   Pin code & Telephone Nos. (if any) 9320801210 email- sachin.90@gmail.com

6. Name of parent / present Institute with DTE code : DTE CODE: 6298

   Name : ZES's zeal college of Engineering & Research, Narhe, Pune-41

7. Course of Study Details : Year / Semester First Year Branch civil Engg

   Choice Code: 629819110

8. Details of the Result of last exam.

| Branch/Faculty | Year/ semester | Year of Passing | Summer / Winter | No of attempt | Percentage | University |
|---|---|---|---|---|---|---|
| civil Engg | First Year | 2021 | summer | 1 | 9.11 SGPA | S.P.P.U |
| | | | | | | |

9. Details of backlog subject (if any) : No Backlog

10. Name and DTE code of aspiring institute where : DTE CODE EN 6298

    Admission by transfer is sought Name zeal college of Engg & Research Narhe pune

11. Branch& Year /semester and university in which : Branch / Course computer Engg

    Admission by transfer is sought Year /Semester second year / 3rd semister

    Choice Code: 629824510

    University: savitribai phule pune university

12. Reasons for change of Institute / change of branch and :

    University savitribai phule pune university

I the undersigned state that the information stated above is true to my knowledge and belief.I am fully aware that transfer / change of institute / branch is not a right and it is up to the authority to decide my case on the basis of merit.

**Date:** 02/09/2021

**Signature of Student**

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६७८९७३
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/पदवी/विनाअनुदानित संस्थाबदल२०२१-२२/२०२१/ 3878    दिनांक : ०१.०९.२०२१

03 SEP 2021

**परिपत्रक :**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ.
पदवी अभ्यासक्रम राबविणा-या खाजगी विनाअनुदानित संस्था,
पुणे विभाग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठ्यक्रम / पाळी बदल, तसेच पहिल्या दुस-या व तिस-या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत...

संदर्भ : १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे परिपत्रक जा.क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२१/७७४ दिनांक २६.०८.२०२१.

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र जा.क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२१/७७२ दिनांक २६.०८.२०२१.

उपरोक्त विषयास अनुसरुन, या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठ्यक्रम/पाळी बदल, तसेच पहिल्या, दुस-या व तिस-या वर्षानंतर संस्था बदल करण्याची कार्यवाही उपरोक्त संदर्भीय परिपत्रक व पत्र यानुसार संस्थास्तरावर, विभागीय स्तरावर व संचालनालय स्तरावर करावयाची आहे.

यास्तव पाठ्यक्रम बदल व संस्था बदलासाठी नियमानुसार पात्र असणा-या इच्छुक विद्यार्थ्यांनी संदर्भ क्रमांक १ चे परिपत्रकामध्ये परिच्छेद क्रमांक २ मधील 'क' ते 'ज' मध्ये नमुद केलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रतींसह त्यांचा विहित अर्ज (Annexure A मध्ये नमुद केल्याप्रमाणे) त्यांना ज्या शैक्षणिक संस्थेत पाठ्यक्रम बदल / संस्था बदल पाहिजे अशा शैक्षणिक संस्थेकडे दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ पर्यंत सादर करावा. सदर दिनांकानंतर तसेच अपुर्ण अर्ज किंवा आवश्यक प्रमाणपत्र / कागदपत्रांविना सादर केलेले अर्जाबाबत काहीही न कळविता असे अर्ज दप्तरी दाखल तथा नस्तीबध्द करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

उपरोक्त प्राप्त अर्जांची पडताळणी करण्यासाठी संदर्भीय परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या निर्देश व सूचनांचे तंतोतंत पालन करुन संस्थाबदलाबाबतचे अर्ज संदर्भ क्रमांक २ सोबत जोडलेल्या Annexure B व संस्थेतील संबंधित पाठ्यक्रमास शिल्लक असलेल्या जागांचा तपशिल (Annexure C – Vacancy Report) यासह दिनांक २४.०९.२०२१ किंवा थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांक यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत या विभागीय कार्यालयास व तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (कार्यासन क्र. २) यांना मूळ कागदपत्रांची पडताळणी केल्याच्या प्राचार्यांच्या प्रमाणपत्रासह पाठविण्यात यावी. विद्यार्थ्यांचा Annexure A मधील अर्ज व त्यासोबतची कागदपत्रांची विद्यार्थीनिहाय स्वतंत्र ई-फाईल (पीडीएफ) व Annexure B ची Microsoft Excel sheet मधील Soft Copy ई-मेलद्वारे या विभागीय कार्यालयास (ropune@dtemaharashtra.gov.in) व तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई (desk2@dtemaharashtra.gov.in) यांना ई मेलद्वारे सुध्दा पाठवावी. संस्था बदलाकरीताच्या अर्जासोबत परिच्छेद क्र. २ (क ते ज) नमूद केलेले कागदपत्रांसह परिपूर्ण अर्जाचा विचार करण्यात येईल. अपूर्ण अर्ज किंवा आवश्यक प्रमाणपत्र / कागदपत्रांविना सादर केलेले अर्जाबाबत काहीही न कळविता असे अर्ज दप्तरी दाखल तथा नस्तीबध्द करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

zes's zcoer
Narhe Pune-411041
Inward No 133
Date 6/9/2021
OS/Registrar
Principal
Handover

...2

पाठ्यक्रम, संस्था व विद्यापीठ स्थलांतरणास संबंधित संस्थेने दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्र व रिक्त जागा विचारात घेऊन मान्यतेची कार्यवाही होणार आहे. याबाबत भविष्यात रिक्त जागा नसल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विद्यार्थ्यांचे स्थलांतरण पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल परिणामस्वरुप विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्थेच्या प्राचार्यांवर व्यक्तीशः जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

संस्था बदल व शाखा बदलासह संस्था बदल याकरीता विद्यार्थ्यांनी ज्या विनाअनुदानित संस्थेसाठी विनंती केलेली आहे त्या विनाअनुदानित संस्थेच्या प्राचार्यांनी याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सोबतच्या प्रपत्र अ मध्ये नमूद कालमर्यादेत होईल याची खबरदारी घ्यावी व आवश्यक तो पाठपुरावा वरिष्ठ कार्यालयांकडे त्यांचे स्तरावरुन करावा. कोविड-१९ या साथरोगाची परिस्थिती विचारात घेता, वरिष्ठ कार्यालयात विद्यार्थी व पालकांना व्यक्तीशः पाठविण्यात येऊ नये या बाबीची विशेष नोंद घ्यावी. तसेच पाठ्यक्रम / संस्था बदलाचे आदेश पारित झाल्यास ते विद्यार्थ्यांना ई-मेल द्वारे संस्था स्तरावरुन पाठविण्यात यावेत.

दि. २४.०४.२०१७ च्या शासन अधिसूचनेतील नियम क्रमांक १६ मधील पाठ्यक्रम, संस्था बदलाच्या तरतुदी / नियम स्पष्ट असून याबाबतची कार्यवाही करताना नियम तथा तरतुदींचे उल्लंघन झाल्यास संबंधित प्राधिका-यास जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, बदली मागितलेल्या विद्यार्थ्यास या संचालनालयाचे मान्यता आदेश प्राप्त झाल्यानंतरच लिव्हींग सर्टीफीकेट द्यावे व कोणत्याही परिस्थितीत तत्पुर्वी ते देण्यात येवु नय, तसेच संबंधित विद्यार्थ्याच्या संस्था बदलासाठी केवळ ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित केल्याच्या कारणास्तव त्याचे संस्थेतील प्रवेश रद्द करु नये अथवा सदर रिक्त होणा-या जागेवर संचालनालयाची मान्यता प्राप्त होण्यापुर्वी इतर विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येऊ नये.

विद्यार्थी संस्था बदलाबाबत सोबतच्या प्रपत्रात नमूद केल्यानुसार कालमर्यादेत कार्यवाही करण्यात यावी. सदर कालमर्यादेपुर्वी विद्यापीठाचा किंवा संस्थेचा निकाल घोषित झाला नसेल तर संबंधित विद्यार्थी शाखा बदल, संस्था बदल, संस्थाबदलासह शाखा बदल, संस्था शाखा बदलासह विद्यापीठ बदल इ. मागणीचा विचार करण्यात येणार नसल्याची माहिती नियमातील तरतुदीच्या आधारे संस्था स्तरावरुन विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

पाठ्यक्रमबदल / संस्थाबदल बाबतची कार्यवाहीची कालमर्यादा व कार्यवाही प्राधिकारी संदर्भ क्रमांक २ सोबतच्या प्रपत्र अ मध्ये स्पष्टपणे दिलेली असून त्याप्रमाणे सर्व संस्थांनी कालमर्यादेचे तंतोतंत पालन करावे. **तसेच संस्थास्तरावर पाठ्यक्रम बदलाच्या केलेल्या कार्यवाहीचा कार्यालयीन आदेश आवश्यक कागदपत्रांसह या विभागीय कार्यालयास सादर करावा.**

संदर्भीय पत्रांना सर्व संस्थांनी त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करावे व सूचनाफलकावर प्रदर्शित करावे जेणेकरुन इच्छूक पात्र विद्यार्थी पाठ्यक्रम / संस्थाबदलापासून वंचित राहणार नाहीत. तसेच शक्य असल्यास विद्यार्थ्यांना अर्ज करण्यास ई-सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

सोबत : संदर्भीय परिपत्रक व प्रपत्राची प्रत.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२, ४४३, ४५०
ई-मेल-desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२१/७७७४ दिनांक : 26 AUG 2021

परिपत्रक

विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम / पाळी बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

संदर्भ : शासन अधिसूचना क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.४७३(भाग-३)/तांशि ४, दि. २४.०४.२०१७

या संचालनालयाच्या अधिपत्याखालील अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्यास संदर्भीन अधिसूचनेतील नियम क्र. १६ अन्वये तरतूद करण्यात आलेली आहे. सदर नियमाची प्रत (मराठी व इंग्रजी मधील) सोबत माहितीसाठी जोडली असून त्यामध्ये पाठ्यक्रम बदल व संस्था बदलासाठीची प्रमुख पात्रता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | विनंती | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | दुसरे वर्ष | अभियांत्रिकी पदवी पाठ्यक्रम / पाळी / संस्था बदल | प्रथम व द्वितीय सत्र उत्तीर्ण किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण, पाठ्यक्रम / पाळी / संस्था बदलीस विंनती केलेल्या शाखेत संबंधित संस्थेत रिक्त जागांची उपलब्धता, तसेच विद्यापीठ बदल होत असल्यास विद्यापीठाने निर्धारीत केलेली पात्रता. |
| २ | तिसरे वर्ष | संस्था बदल | प्रथम वर्ष उत्तीर्ण, द्वितीय वर्षाच्या परीक्षेमध्ये तृतीय व चतुर्थ सत्र उत्तीर्ण किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण, संस्था बदलीस विंनती केलेल्या संस्थेतील संबंधित वर्ग शाखेत रिक्त जागांची उपलब्धता व विद्यापीठ बदल होत असल्यास विद्यापीठाने निर्धारीत केलेली पात्रता |
| ३ | चौथे वर्ष | संस्था बदल | प्रथम व द्वितीय वर्ष उत्तीर्ण, तृतीय वर्षाच्या परीक्षेमध्ये पाचवे व सहावे सत्र उत्तीर्ण किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण, पाठ्यक्रम / पाळी / संस्था बदलीस विंनती केलेल्या संस्थेतील संबंधित वर्ग शाखेत रिक्त जागांची उपलब्धता व विद्यापीठ बदल होत असल्यास विद्यापीठाने निर्धारीत केलेली पात्रता |

२. पाठ्यक्रम बदल व संस्था बदलासाठी नियमानुसार पात्र इच्छुक विद्यार्थ्यांनी त्यांचा अर्ज (अर्जाचा नमुना Annexure A ज्या शैक्षणिक संस्थेत पाठ्यक्रम बदल / संस्था बदल पाहिजे अशा शैक्षणिक संस्थेकडे खालील कागदपत्रांसह दि. २३ सप्टेंबर, २०२१ पर्यंत सादर करावा. सदर दिनांकानंतर तसेच अपुर्ण अर्ज किंवा आवश्यक प्रमाणपत्र / कागदपत्रांविना सादर केलेले अर्जांबाबत काहीही न कळविता असे अर्ज दप्तरी दाखल तथा नस्तीबध्द करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

क) संस्था बदलासाठीचा अर्ज (सोबत जोडलेल्या नमुन्यात)

ख) सध्या शिक्षण घेत असलेल्या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र

ग) बदलीने प्रवेश देणा-या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र

घ) ज्या वर्षासाठी (दुसरे, तिसरे, चौथे) संस्था बदलासाठी विनंती केली आहे, त्या वर्षापूर्वीच्या सर्व वर्गाच्या गुणपत्रिका

ङ) संस्था बदलामुळे विद्यापीठ बदल असल्यास विद्यापीठ पात्रता प्रमाणपत्र.

च) शिक्षणात खंड असल्यास ज्या शैक्षणिक संस्थेतील शैक्षणिक खंड आहे त्या संस्थेच्या प्राचार्यांनी दिलेले खंड प्रमाणपत्र (Gap Certificate) किंवा रु.१००/-च्या स्टँप पेपरवर शिक्षणातील खंडाबाबत प्रतिज्ञापत्र.

छ) प्रथम वर्ष किंवा थेट द्वितीय वर्ष प्रवेशाचे अॅलॉटमेंट लेटर (उपलब्ध असल्यास).

ज) संस्था बदल करण्यासाठीचे कारण या पृष्ठर्थ पुरावे

३. संस्था बदलाकरीताच्या अर्जासोबत परिच्छेद क्रमांक २ (क ते ज) नमूद केलेले कागदपत्रासह परिपूर्ण अर्जाचा विचार करण्यात येईल. अपूर्ण अर्ज किंवा आवश्यक प्रमाणपत्र / कागदपत्रांविना सादर केलेले अर्जांबाबत काहीही न कळविता असे अर्ज दप्तरी दाखल तथा नस्तीबध्द करण्यात येतील याची नोद घ्यावी.

४. विद्यार्थ्यांनी सध्या शिक्षण घेत असलेल्या शैक्षणिक संस्थेकडून फक्त ना-हरकत प्रमाणपत्र घ्यावे, लिव्हींग सर्टीफीकेट घेऊ नये, संस्था बदलाचे आदेश पारित झाल्यानंतरच लिव्हींग सर्टीफीकेट घेण्यात यावे.

५. प्रथम / द्वितीय वर्षात एकदा प्रवेश घेतलेला विद्यार्थी त्याच शैक्षणिक वर्षात इतर कोणतीही संस्था बदलून मागण्यास पात्र असणार नाही.

६. विना-अनुदानित संस्थेतील विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत शासकीय, शासन अनुदानित, विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ संचालित शैक्षणिक संस्थेमध्ये संस्था बदल अनुज्ञेय नाही, तथापी शासकीय, शासन अनुदानित, विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ संचालित शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यांना विना-अनुदानित शैक्षणिक संस्थेत संस्था बदल अनुज्ञेय आहे.

७. विद्यार्थ्यांना, कोणत्याही टप्प्यावर स्वायत्त संस्थांमध्ये बदलून जाता येणार नाही.

८. अधिसंख्य कोटयातील जागे अंतर्गत प्रवेशित विद्यार्थी (Admitted under Supernumerary Quota seats) पाठ्यक्रम किंवा संस्था बदलासाठी पात्र नाहीत.

९. संस्था बदलासाठीच्या प्रक्रियेपूर्वी विद्यापीठाचा किंवा संस्थेचा निकाल घोषित झाला नसेल तर, संबंधित विद्यार्थ्यांचा शाखा बदल, संस्था बदल इ. मागणीचा विचार करण्यात येणार नाही.

१०. संस्था बदल ज्या संस्थेत पाहिजे आहे त्याच संस्थेकडे विद्यार्थ्यांनी परिपूर्ण अर्ज जमा करावयाचा असून या कार्यालयाकडे किंवा सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे विद्यार्थ्यांनी थेट अर्ज करु नये. या कार्यालयाकडे किंवा सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे प्राप्त होणा-या थेट अर्जावर कोणतीही कार्यवाही होणार नाही याची कृपया नोंद घेण्यात यावी.

११. संस्था बदलासाठीचा अर्ज जमा केल्यानंतर सदर अर्जावरील पुढील कार्यवाही तथा पाठपुरावा संबंधित संस्थेकडून करण्यात येणार असल्याने विद्यार्थी व पालकांनी या कार्यालयास किंवा सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे व्यक्तीश: भेट देऊ नये.

१२. विद्यार्थ्यांनी संस्था बदलासाठीच्या विनंती अर्जात त्यांचा ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक नमूद करावा, जेणेकरून त्यांचे अर्जाच्या अनुषंगाने अधिकची माहिती आवश्यक असल्यास ती तात्काळ उपलब्ध करून घेणे शक्य होईल. तसेच त्यांची विनंती मान्य झाल्यास मान्यतेचे आदेश त्यांना ई-मेल द्वारे पाठविणे शक्य होईल.

१३. पाठ्यक्रम, संस्था व विद्यापीठ स्थलांतरण विद्यार्थ्यांच्या विनंतीनुसार केल्यामुळे होणा-या कोणत्याही शैक्षणिक परिणामास विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील.

१४. सध्या शिक्षण घेत असलेल्या संस्थेकडून मुळ प्रमाणपत्र घेण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थी तथा त्याच्या पालकाची राहील.

१५. संस्था स्थलांतरणामुळे पूर्वीच्या संस्थेतील फी परतावा किंवा अदा करावयाची असल्यास तसेच स्थलांतरणाच्या संस्थेत फी अदा करण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थी तथा त्याच्या पालकाची राहील.

१६. एमबीए, एमसीए, पीजीडीएम, एमई/एमटेक, एम.फार्म, एम.आर्च,एम.एचएमसीटी इ. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास नियमानुसार संस्था बदल अनुज्ञेय नाही. यास्तव सदर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी संस्था बदलासाठी अर्ज करू नये.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्र शिक्षण,म. रा. मुंबई

प्रत : मा. सचिव, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग,फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थाना अग्रेषित करून संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करण्यास कळविण्यात यावे.

२. प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी पदवी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करून पुढील उचित कार्यवाही कालमर्यादेत करण्यात यावी.

३. मा. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (पात्रता शाखा)

४. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई

५. कार्यासन क्रमांक २, निवड नस्तीस.